**MHKO100012132020**

## आदेश निशाणी क्र. ३२

**१.** प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज पुरावा कायदा कलम ६३ प्रमाणे दुय्यम पुरावा करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करून अर्जात नमूद कारणे लबाडीची असून दिनांक ०२.०९.१९९८ चा दस्त वादीकडे नव्हता व सदरचा दस्त प्रतिवादीकडे असल्याचा गैरफायदा घेवून वादी हरकत अडथळा करू लागले आहेत.

**३.** प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले.

**४.** दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

**५.** सौ. कृष्णाबाई गुंडू लोहार यांनी दावा मिळकत मौजे महागाव, ता. गडहिंग्लज येथील रि.स.नं. १४०९ पैकी ५२.०४ चौ. मी. चतु:सिमापुर्वक मिळकत प्रतिवादी क्र. १ यांना रजिस्टर खरेदी दस्त क्र. १८१७ दिनांक ०२/०९/१९९८ रोजी करून दिला आहे त्या दस्ताची सही शिक्याची प्रत प्रतिवादी यांनी याकामामी हजर केली आहे ती दुय्यम पुरावा म्हणून वाचवा असे कथन केले आहे. प्रतिवादी यांनी वर्णन यादी निशाणी क्र. ३६ ला प्रस्तुत खरेदीपत्र दस्ताची सही शिक्याची प्रत दाखल केली आहे. प्रतिवादीचे विद्वान वकील आपले कथानाचे पुष्टयर्थ मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी **PARASANBAI Dhanraj Jain Vs. Sunanda Madhukar Jadhav 2017(6) All MR 877** या न्यायनिर्णयामध्ये दिलेल्या निकालाचा आधार घेतला. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की, कोणताही दुय्यम पुरावा घेताना न्यायालयाच्या परवानगीची आवश्यकता नाही आणि

न्यायालय अशी परवानगी नाकारू शकत नाही व न्यायालय अशा कोणत्याही अर्जासाठी आग्रह धरू शकत नाही.

६. अशा परिस्थितीत खरेदी दस्त क्र. १८१७ दिनांक ०२/०९/१९९८ ला दुय्यम पुरावा करणेस संधी दिलेस दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय करणेस मदत होणार आहे. वादी यांनी सदर दस्तऐवजास निशाणी देणेस हरकत घेतली असली तरी मा. उच्च न्यायालयच्या वर नमूद न्यायनिर्णयात दिलेल्या निरीक्षणचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे संयुक्तीक वाटते. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. म्हणून मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजूर करणेत येतो.

२) प्रतिवादी यांना खरेदी दस्त क्र. १८१७ दिनांक ०२/०९/१९९८ दुय्यम पुरावा करणेस परवानगी देणेत येते.

DHANASHRI MAHADEV PAWAR

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2024.06.19 15:28:26 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १८/०६/२०२४

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज